रविवार
महाराष्ट्र टाइम्स
FRONT PAGE - 2
मुंबई । रविवार, २४ नोव्हेंबर

**न्या. बोबडे तिरुपतीत**

तिरुपती : सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी शनिवारी तिरुपती येथील वेंकटेश्वराचे दर्शन घेऊन प्रार्थना केली. त्याआधी रेनिगुंटा विमानतळावर आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी त्यांचे स्वागत केले. न्या. बोबडे यांनी सोमवारीच सरन्यायाधीश पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.




# धर्मातील अंतर्विरोधांची मीमांसा

महावीर जोंधळे
vachak.vishesh@gmail.com

डॉ. अजित मगदूम यांनी 'ओम णमो' या शांतिनाथ देसाईलिखित कन्नड कादंबरीचा केलेला मराठी अनुवाद नुकताच साहित्य अकादेमीने त्याच नावाने प्रकाशित केला आहे. एका जैन कुटुंबातील कर्मकांडात बुडलेली जुनी पिढी एकीकडे, तर दुसरीकडे आचरणकेंद्री धर्मातील फोलपणा ओळखणारी मधली पिढी, आणि तिसरीकडे विवेकनिष्ठता, विज्ञाननिष्ठतेला प्रमाण मानणारी नवी पिढी यांच्यातील ताणेबाणे विलक्षण ताकदीनं यात मांडले आहेत.

कादंबरीचं कथानक धारवाडजवळच्या कृष्णापूर येथील गडगंज शेतीवाडी बाळगून असणाऱ्या देसाई कुटुंबाचं आहे. अप्पासाहेब देसाई हे बडं प्रस्थ. जैन मंदिरांना उदारहस्ते देणग्या देऊन समाजात आपली प्रतिष्ठा कायम राखण्याचं चातुर्य त्यांच्याकडे आहे. पण त्यांचे मोठे बंधू देवेंद्रप्पा हे खरे धर्मानुयायी. अप्पासाहेबांना स्वारस्य भोगात, तर देवेंद्रप्पाना त्यागात आहे. अप्पासाहेबांचा मुलगा भरत दुर्वर्तनी आहे. तर देवेंद्रप्पाचा मुलगा नेमिनाथ इंग्लंडमधील विद्यापीठात प्रोफेसर आहे. तिकडे जाण्यापूर्वी विवाहबद्ध होऊनही पत्नीला इंग्लंडला न नेता तिथेच तो एमिलियाशी विवाह करतो. त्यांचा मुलगा ॲडम आपल्या एन या सहाध्यायी मैत्रिणीबरोबर भारतात संशोधनानिमित्त येतो.

एन जैन तत्त्वज्ञानाचा अभ्यास करताना प्रभावित होऊन ख्रिश्चन असूनही जैन धर्माची दीक्षा घेते. ॲडम मात्र अर्धा जैन, अर्धा ख्रिश्चन असूनही जैन धर्माची खिल्ली उडवतो. एन संशोधनानिमित्त श्रवणबेळगोळाला जाते. दोघांचे संबंध पाश्चात्य संस्कृतीप्रमाणे मोकळे आहेत. मधेच रोजा या तरुणीशी या दोघांची ओळख होते. काही काळ ॲडमला तिच्याबद्दल कुतूहल आणि ओढ निर्माण होते. दोघांच्यातील चर्चेतून रोजा पक्की साम्यवादी विचारांची असल्याचं दिसून येतं. तिच्या दृष्टीनं ॲडम हा कोणतीही भूमिका नसलेला, उथळ मुलगा. त्यामुळे तिला त्याच्यात स्वारस्य वाटत नाही. परिणामी ॲडम आणि एन यांच्यातील बंध पुन्हा घट्ट होतात.




सत्तरीतल्या अप्पासाहेबांच्या हृदयविकारामुळे ते हुब्बळीच्या हॉस्पिटलमध्ये सलाईनमधून टपकणारा एक एक थेंब मोजत आहेत. आयुष्यभर असाच पैसा आणि काही बायकाही मोजत राहिलो असा खटयाळ विचार त्यांच्या मनात येऊन जातो. दुसऱ्याच क्षणी आपला जीवही थेंबाथेंबाने संपत असल्याचा भास होऊन त्यांच्या पोटात धस्स होतं. अशी कादंबरीची वेधक सुरुवात होते. कादंबरीचा शेवट हा लेखकाच्या प्रयोगशीलतेचा एक भाग म्हणता येईल. कलाकृतीच्या चिरंतन प्रवासाचं सूचनही देसाईंनी केलं आहे. शंतीनाथ देसाई हे कन्नड साहित्यातील 'नव्य'कथेचे अध्वर्यू मानले गेले आहेत. कथानकातून बाहेर येऊन वाचकांशी, कधी समीक्षकांशी संवाद साधणं हेही एक 'नव्य' वैशिष्ट्य इथं पाहायला मिळतं.

उपहास आणि विरोधाभास यांनी भरलेली ही कादंबरी त्यामुळेच वाचनीय ठरते. कादंबरीतील पात्रांमध्ये होणारी वैचारिक घुसळण, तात्त्विक चर्चा यामुळं आशयाला एक उंची प्राप्त होते. 'मुनींचं केशलोचन ही खासगी बाब लोकांसमोर का केली जाते? हा स्वहिंसेचा प्रकार नव्हे काय?' असे अनेक प्रश्न एन विचारत राहते. महामस्तकाभिषेक हे सामाजिक-राजकीय आणि आर्थिक महत्त्वाकांक्षेचं एक प्रदर्शन आहे असं ती म्हणते. 'जैन महापुराण'मधील जन्म-जन्माची कहाणी एन वाचते तेव्हा त्यात तिला एक लॉजिक आढळून येतं. भूलोक आणि स्वर्गलोक ही एक सर्जनशील उत्क्रांती (Creative Evolution ) असल्याचं सांगून, याचं बर्गसन आणि बर्नार्ड शॉ यांच्या तत्त्वज्ञानाशी साम्य असल्याचं ती दाखवून देते. एन वृथा कर्मकांडांना विरोध करते. श्रवणबेळगोळा इथं राहून मुनींनाही प्रश्न विचारते, ज्याची त्यांना सवय नसते.

ॲडमला मात्र तिची सखोल चिकित्सक वृत्ती फारशी आवडत नाही. 'धर्माच्या जंजाळात गुंतू नकोस, लाइफ एन्जॉय कर', असं तो तिला सांगतो. भरतही धर्मातील बंधनावर टीका करतो. एकदा तो म्हणतो, "हा नकारात्मक धर्म आहे . सगळ्याचा त्याग करायला लावणारा, मृत्यूकडे घेऊन जाणारा शून्यवत धर्म आहे." रोजा तर प्रत्येक बाबीकडे साम्यवादी परी प्रेक्षातून पाहत असते. श्रवणबेळगोळा येथील गोमटेश्वराची ५८ फूट उंचीची भव्य मूर्ती पाहून सारे आनंदून जातात. शिल्पकार कोण असेल याची चर्चा होते तेव्हा रोजा म्हणते, 'सरंजामशाही काळात शिल्पकाराला आज्ञा देणारा महत्त्वाचा - शिल्पकार हा गुलामासारखाच.'

भगवान महावीरांच्या निरीश्वर विचारांचं अधिष्ठान लाभलेला, सत्य, अहिंसा, अपरिग्रह, अनेकांतवाद, स्याद्वाद इ. उच्च नैतिक मूल्यांची शिकवण देणाऱ्या या धर्माची श्रेष्ठता एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला कालौघात वाढलेला डामडौल, महामस्तकाभिषेकानिमित्त होणारी पैशांची उधळण, एकंदर तत्त्वं बाजूला सारून आचरणाच्या अवडंबरामुळे होत असणारा मूल्यांचा ऱ्हास इ. बाबींची तटस्थपणे चिकित्सा केली आहे. धार्मिक कार्यक्रमातील चारित्र्यहीन, दांभिक धनवंतांचा वावर आणि आचारातील कठोर नियमांमुळे धर्मापासून दूर राहणारा युवावर्ग यावरही देसाईंनी प्रकाश टाकला आहे.

आज हेच चित्र इतर सर्व धर्मांत कमीअधिक प्रमाणात दिसत असल्याने सबंध भारतीय समाजाचं प्रातिनिधिक रूप वाचकांसमोर मांडलं आहे असं म्हणता येईल.

जैन पारिभाषिकतेचा, संस्कृती आणि तत्त्वविचारांचा अभ्यास असणारे अजित मगदूम यांनी एका वेगळ्या वळणाची कादंबरी मराठीत आणल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करायला हवं!

मटा

**'ओम णमो'**
मूळ लेखक : शांतिनाथ देसाई
अनुवाद : डॉ अजित मगदूम
प्रकाशक : साहित्य अकादमी, नवी दिल्ली
पृष्ठं : २५३, किंमत : २२५ रु.

CamScanner